चंद्रपूरमध्ये वीज बिल भरणा केंद्र सुट्टीच्या दिवशीही सुरु राहणार

चंद्रपूर, दि. २३: महावितरणची वीजबिल वसुली मोहिम जोरात सुरू असून २६, २८, २९, ३१ मार्चला सार्वजनिक सुटटीच्या दिवशी महावितरणच्या वीज बिल भरणा केंद्रात बिल भरता येईल अशी माहिती सूत्रांनी दिली.

महावितरण चंद्रपूर परिमंडळ कार्यालयातर्फे गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयात चालु विज देयके थकित विज देयके भरण्याकरीता वीज बिल वसुली मोहिम राबविण्यात येत आहे. सांघीक कार्यालयाकडून दिलेले लक्ष-उद्दीष्टे साध्य करण्याकरीता चंद्रपूर परिमंडळा अंतर्गत २ प्रविभाग व ६ विभागीय कार्यालये आणि २९ उपविभागीय कार्यालयाअंतर्गत सर्व अधिकारी-कर्मचारी थकबाकी व चालू विज देयके भरणा करण्याकरीता वसूली मोहिम सतत राबवित असून विज बिल वसुलीचे उद्दीष्टये गाठण्याकरीता मार्च महिन्यात वसुली मोहिम तीव्र करण्यात आलेली आहे.

आर्थिक वर्ष संपायला आता शेवटचे आठ दिवसाचा कालावधी उरला आहे. या आठ दिवसांमध्ये महावितरणला गडचिरोली व चंद्रपूर मंडळातील जवळपास आर.सी.आय. ग्राहकांकडे ३१ कोटी रुपयाची थकित व चालु वीज बिलाची वसुली करायची आहे. त्यामुळे महावितरण कार्यालयाने विशेष वीज बिल वसुली मोहिम सुरु केली आहे. वीज देयके न भरणाऱ्या वीज ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यास सुरुवात केली आहे.

ज्या ग्राहकांकडे वीज बिल थकीत आहे अशा सर्व ग्राहकांना सर्वप्रथम फोन द्धारे माहिती दिली जात असुन त्यानंतरही वीज बिलाचा भरणा न केल्यास त्यांना प्रत्यक्ष भेटीद्धारे बिल भरणा करण्यास अवगत करण्यात येत आहे. वीज बिल मोहिमेस सहकार्य न करणाऱ्या ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित करण्याची कारवाई महावितरणकडून करण्यात येत आहे. तसेच महावितरणतर्फे वीज बिल वसुली मोहिम राबवितांना कार्यालयीन कामात व्यत्यय निर्माण होऊ नये याकरीता आवश्यकतेनुसार ठिकठिकाणी पोलीस संरक्षणसुध्दा घेण्यात येत आहे. ग्राहकांच्या सोई सुविधेकरीता तसेच महावितरणच्या वीज बिल मोहिमेच्या कारवाईमुळे वीज ग्राहकांची गैरसोय होऊ नये याकरीता सार्वजनिक सुटटीच्या दिवशी म्हणजे शनिवार रविवार देखील वीज बिल भरणा केंद्र, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात सुटटीच्या दिवशी सुरु ठेवण्यात येत आहे. तसेच महावितरणच्या संकेतस्थळावर व मोबाईल ॲपद्धारे घरबसल्या कोठूनही वीज बिल भरणा करता येईल. वीज पुरवठा खंडित करण्याच्या कार्यवाहीपासुन ग्राहकांनी वंचित राहण्याकरीता चालु व थकित वीज बिलाचा मार्च-२०२६ अखेरीस सर्व वीज ग्राहकांनी वीज देयकाचा भरणा करावा असे आवाहन चंद्रपूर महावितरणचे मुख्य अभियंता हरीश गजबे यांनी केलेले आहे.

पुणे रिंगरोड प्रकल्पाचे काम २५ टक्के पूर्ण

पुणे, दि. २३: पुणे रिंगरोड या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या कामाला वेग आला असून, सुमारे २५ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएसआरडीसी अधीक्षक अभियंता राहुल वसईकर यांनी दिली. पुण्याच्या रिंगरोडचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यासंदर्भात शासनाकडून देखील वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे. राज्यातील पायाभूत सुविधांच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात असून, भविष्यात पुण्याच्या वाहतूकव्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे.

पुणे शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता वाहतूक कोंडी ही मोठी समस्या बनली आहे. या पार्श्वभूमीवर रिंगरोड प्रकल्पामुळे शहराबाहेरील वाहतूक थेट वळविणे शक्य होणार आहे. त्यामुळे शहरातील मुख्य रस्त्यांवरील ताण कमी होऊन प्रवास अधिक जलद आणि सुलभ होईल.

या रिंगरोडमुळे पुणे जिल्ह्यातील विविध तालुके तसेच औद्योगिक क्षेत्रे एकमेकांशी अधिक प्रभावीपणे जोडली जाणार आहेत. विशेषतः मुंबई-बंगळुरू महामार्ग, नगर रोड, सोलापूर रोड यांसारख्या प्रमुख मार्गांना जोडणारी ही रिंगरोड कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत करणार आहे. त्यामुळे मालवाहतूक आणि प्रवासीवाहतूक दोन्हीमध्ये वेळेची बचत होणार आहे. दरम्यान, प्रकल्पाच्या उर्वरित कामासाठी प्रशासनाने गती वाढवली असून, येत्या काही वर्षांत संपूर्ण रिंगरोड पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एकूणच, पुणे रिंगरोड हा प्रकल्प शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

पुण्यातील कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाचा मार्ग मोकळा

पुणे, दि. २३: गेल्या आठ वर्षांपासून रखडलेल्या कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादन प्रक्रियेला आता वेग आला आहे. पहिल्या टप्प्यातील ५० मीटर रुंदीकरणासाठी आवश्यक असलेल्या निधीपैकी उर्वरित १३६ कोटी रुपये पुणे महापालिकेने नुकतेच जिल्हाधिकारी कार्यालयातील विशेष भूसंपादन अधिकारी क्रमांक १५ यांच्याकडे सुपूर्त केले आहेत. यामुळे भूसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून, १५ एप्रिलपर्यंत ही कार्यवाही पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे.

साडेतीन किलोमीटर लांबीचा आणि ८४ मीटर रुंदीचा कात्रज-कोंढवा रस्ता हा पुणे शहरातील पायलट प्रोजेक्ट म्हणून हाती घेण्यात आला होता. मात्र, भूसंपादनाअभावी रस्त्याचे रुंदीकरण रखडले आणि तुकड्या तुकड्यात हे काम करण्याची वेळ प्रशासनावर आली. वाढत्या खर्चामुळे महापालिका आयुक्तांनी पहिल्या टप्प्यात ८४ ऐवजी ५० मीटर रस्ता रुंदीकरण करण्याचा निर्णय घेतला. या कामासाठी यापूर्वी अर्धा निधी वितरित करण्यात आला होता, आता उर्वरित रक्कम जमा झाल्याने या प्रक्रियेला गती मिळणार आहे.

सोलापूर महापालिका, पाटबंधारे विभागाच्या चुकीमुळे कारवाईची टांगती तलवार

सोलापूर, दि. २३: आदिला नदी परिसर महापालिका प्रशासनो यलो झोन जाहीर केला आहे. महापालिकेने अंतिम लेआऊट मंजूर केला आहे. महापालिकेच्यावतीने बांधकाम परवाना दिला आहे. टॅक्स महापालिका वसुल करते. मात्र आताच कशी आमची घरे बेकायदा ? असा संतप्त सवाल आदिला नदी परिसरात राहणाऱ्या नागरिकांचा आहे. नाल्याला नदी संबोधून महापालिका प्रशासनसाकडून जे निर्बंध लादले जात आहेत. वास्तविक पाहता महापालिका आणि पाटबंधारे विभागाच्या चुकीच्या धोरणामुळे घरावर कारवाईची टांगती तलवार आहे. यामुळे परिसरातील जवळपास ८०० गट बाधित होणार असल्याचे परिसरतील नागरिक हवालदिल झाले आहेत.

जुलै महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि अतिरिक्त पावसामुळे आदिला नाला की नदी या वादामुळे आता नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रासाला सामोरे जावे लागत आहे. प्रशासकीय स्तरावरून कागदपत्रावरून सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण कार्यकर्त्यांनी ही आदिला नदी असल्याचा दावा केलेला आहे आणि त्यामुळे महापालिका स्तरावरसुद्धा मोठ्या प्रमाणात वाद-विवाद आहेत. नदी संबोधून महापालिकेकडून या नाल्याच्या परिसरातल्या अनेक लोकांना निर्बंध लादले गेले आहेत.

PUBLIC NOTICE

I, **RISHI VIMAL MAKADIA,** son of **Vimal Jayantilal Makadia** and **Urvashi Vimal Makadia**, residing at 3/301, Prathamesh Vihar, 90Ft Road, Thakur Complex, Near IBPS, Borivali (East), Mumbai - 400066, hereby state that:

My name has been previously recorded as **Rishikumar Vimalkumar Makadia,** my father's name as **Vimalkumar Jayantibhai Makadia,** and my mother's name as **Urvashiben Vimalkumar Makadia** in various records.

I have changed my name to **Rishi Vimal Makadia,** and the correct names of my parents are:

- **Father: Vimal Jayantilal Makadia**
- **Mother: Urvashi Vimal Makadia**

This declaration is made for all purposes, including my passport application and updating official records.

Sd/-
RISHI VIMAL MAKADIA
Place: Mumbai Date: 24.03.2026

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public that JAIPRAKASH MANOHAR DALVI who was owner of Flat No. A - 004, Krishnasthal Nandavan CHS. Ltd. Building No. 4, Meera Village, Off. Western Express Highway, Kashimira, Mira Road (East), Thane- 401107 who expired on 19.02.2025. That son Kapil Dalvi and married daughter Meghal Gangurde of deceased member are intending to transfer the said flat in their name. The undersigned advocates hereby invite claims/objections from claimant/s or objector/s for the transfer of the said right, interest or title in the said flat within a period of 15 days from date of publication of this notice, with copies of documentary proofs to support their claim, within the period of prescribed above. If no claim and or objections is/are received within prescribed period, our client will be free to transfer the said flat in their names.

M/S JCBL EGAL - Advocates
4, Arvind Kunj, Carter Road No. 2
Opp. Krantijyoti Savitribai Phule Hosptial,
Borivali East, Mumbai-66 .

सार्वजनिक सूचना

याद्वारे कळविण्यात येते की **आचरत बाग को.ऑप. हाऊसिंग सोसायटी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. फ्लॅट नं. ४१ ब विंग**, यांचे शेअर सर्टिफिकेट नं. ३७ (शेअर्स नं. १७१ ते १७५) श्री. दिनेश रणछोड्डास मानेक यांच्या नावाने असलेले मूळ शेअर सर्टिफिकेट हरवले आहे.

सदर शेअर सर्टिफिकेटचा डुप्लिकेट मिळण्यासाठी सोसायटीकडे अर्ज करण्यात आला आहे. याबाबत कोणास हरकत असल्यास त्यांनी ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून **15 दिवसांच्या आत** सोसायटीच्या सचिवांकडे प्रशासकीय कार्यालय आचारत बाग सहकारी गृहनिर्माण संस्था लि., फिरोजशाह स्ट्रीट, सांताक्रूझ वेस्ट, मुंबई-४०००५४ येथे आहे. लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट देण्यात येईल.

ठिकाण: मुंबई. दिनांक: २३/०३/२०२६
सही:
दिनेश रणछोडदास मानेक

जाहीर सूचना

याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, श्रीमती माधुरी बबन सकट, भारतीय रहिवासी, पत्ता: प्लॉट क्र.८२६, घर क्र.सी-२, चारकोप वेदांत सहकारी गृहनिर्माण संस्था (एम), आर.एस.सी. ९, सेक्टर-८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७, यांची मुंबईमध्ये वैयक्तिक कामासाठी रिक्षाने प्रवास करत असताना, दिनांक १०.०३.२०२६ रोजी किंवा त्या सुमारास, काही महत्त्वाची कागदपत्रे असलेली एक बॅग हरवली आहे. सदर रिक्षातून उतरल्यानंतर त्यांनी ती बॅग अनवधानाने तिथेच मागे सोडली; त्यानंतर अथक प्रयत्न करूनही ती बॅग सापडू शकली नाही आणि ती हरवली असल्याचे मानले जात आहे. सदर बॅग हरवल्याबाबत त्यांनी दिनांक १७.०३.२०२६ रोजी पोलीस तक्रार दाखल केली आहे. सदर बॅगेमध्ये निवासी जागा चारकोप वेदांत सहकारी गृहनिर्माण संस्था एम, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ या जागेशी संबंधित भाग प्रमाणपत्र सह इतर महत्त्वाची कागदपत्रे होती. सर्व व्यक्तींना याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी सदर हरवलेल्या कागदपत्रांच्या आधारे कोणताही व्यवहार करू नये किंवा त्यावर विश्वास ठेवू नये. तसेच ज्या कोणत्याही व्यक्तीला सदर कागदपत्रे सापडतील, किंवा ज्यांचा त्या कागदपत्रांवर कोणताही दावा, आक्षेप अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत खालील स्वाक्षरीकर्त्या व्यक्तीस लेखी स्वरूपात कळवावे (संपर्क क्र.: ८३६९०९०३७९); तसे न केल्यास, अशा कोणत्याही दाव्याचा विचार केला जाणार नाही.

जाहीर सूचना

खालील स्वाक्षरीकर्त्याद्वारे सर्वसामान्य जनतेस अशी सूचना देत आहे की, माझे अशील श्री. प्रतीक जगत शाह, रहिवासी पत्ता: खोली क्र.५०, मिंट रोड, जनरल पोस्ट ऑफिस समोर, फोर्ट, मुंबई-४००००१ हे खालीलप्रमाणे जाहीर सूचना प्रसिद्ध करत आहेत:

माझ्या अशिलांनी श्रीजी प्लाझा को-ऑपरेटिव्ह प्रिमायसेस सोसायटी लिमिटेड, टाटा रोड क्र.१, जे.एस.एस. रोड, मुंबई-४००००४ येथील श्रीजी प्लाझा इमारतीमधील, २ऱ्या मजल्यावरील युनिट/फ्लॅट क्र.३७ हे मे. ओम आनंद एक्सपोर्ट्स यांच्याकडून खरेदी केले आहे. या व्यवहाराची नोंदणी मुंबई येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दिनांक १९.०३.२०२० रोजी अनुक्रमांक बीबीई-१/१८५०/२०२० अन्वये करण्यात आली असून, माझ्या अशिलांनी यापोटी काही अंशी रक्कम अदा केली आहे.

मे. ओम आनंद एक्सपोर्ट्स यांनी माझ्या अशिलांना अशी माहिती दिली आहे की, पुमा इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. आणि मे. ओम आनंद एक्सपोर्ट्सचे भागीदार - श्री. अर्जुनभाई जी. पटेल, श्री. धीरजलाल ए. पटेल, श्री. जयंतीभाई ए. पटेल व श्री. संजयभाई ए. पटेल-यांच्यामध्ये दिनांक ११.०३.२००० रोजी निष्पादित झालेला नोंदणी दिनांक २३.०३.२००० रोजीचा मूळ करारनामा झाला होता आणि फ्लॅट क्र.३७ च्या संदर्भात श्रीजी प्लाझा को-ऑपरेटिव्ह प्रिमायसेस सोसायटी लिमिटेडने दिनांक १५.०८.२००४ रोजी निर्गमित केलेले भाग प्रमाणपत्र क्र.३०.

उपरोक्त नमूद केलेला दिनांक ११.०३.२००० रोजीचा पुमा इन्व्हेस्टमेंट प्रा.लि. आणि मे. ओम आनंद एक्सपोर्ट्स ही संस्था दिनांक २३.०३.२००० रोजी नोंदणीकृत यांचे भागीदार- श्री. अर्जुनभाई जी. पटेल, श्री. धीरजलाल ए. पटेल, श्री. जयंतीभाई ए. पटेल व श्री. संजयभाई ए. पटेल यांच्यामध्ये निष्पादित झालेला मूळ करारनामा आणि फ्लॅट क्र.३७ च्या संदर्भात श्रीजी प्लाझा को-ऑपरेटिव्ह प्रिमायसेस सोसायटी लिमिटेडद्वारे दिनांक १५.०८.२००४ रोजी निर्गमित करण्यात आलेले भाग प्रमाणपत्र क्र.३० हे गहाळ झाले असून ते आता सापडलेले नाही. सदर मूळ कागदपत्रे गहाळ झाल्याप्रकरणी माझ्या अशिलाने संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, सदर तक्रारीची नोंद तक्रार क्र.३०४४९ अन्वये दिनांक २३.०३.२०२६ रोजी करण्यात आली आहे.

जर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा, बँकेचा किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा सदर मालमत्तेच्या संदर्भात विक्री, भाडेपट्टा, धारणाधिकार, गहाण, बोजा, भार, बक्षीसपत्र, सुखभोग अधिकार, पोटगी, वारसाहक्क, मृत्युपत्रविषयक तरतूद किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा असोकोणताही दावा आणि/किंवा आक्षेप असल्यास; अथवा सदर मालमत्तेशी संबंधित कोणतेही मालकी हक्काचे कागदपत्रे किंवा भाग प्रमाणपत्र कोणाच्याही ताब्यात असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनापासून १४ दिवसांच्या आत त्यास पुष्टी देणाऱ्या कागदोपत्री पुराव्यांसह, खालील स्वाक्षरीकर्त्याच्या कार्यालयाच्या पत्त्यावर संपर्क साधावा. तसे करण्यात कसूर झाल्यास, अशा व्यक्तीचे सर्व दावे त्यांनी सोडून दिले आहेत आणि/किंवा त्यापासून माघार घेतली आहे, असे मानले जाईल. त्यानंतर माझा अशील सदर व्यवहार पूर्ण करेल आणि उर्वरित मोबदला (रक्कम) मे. ओम आनंद एक्स्पोर्ट्स यांना अदा करेल. तसेच, सदर १४ दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर उपस्थित केले जाणारे कोणतेही आक्षेप माझ्या अशिलावर आणि/किंवा सदर मालमत्तेवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक: २४.०३.२०२६ **सही/-**
राजन व्ही. पीळ्ळई
वकील
कार्यालय क्र.१०१, १ला मजला, साई सदन, ७६/७८, मोदी स्ट्रीट, हॉटेल मॉडर्न समोर, फोर्ट, मुंबई-४००००१.
ईमेल:rajan.adv@gmail.com
०२२-४७७७९७९१, ०२२-४०१३५७२१
०९८१९४७४८३८, ०९९८७७१४८३८

जाहीर सूचना

याद्वारे अशी सूचना देण्यात येते की, स्वर्गीय बंगाली छन्नू गुप्ता हे फ्लॅट क्र.८०२, ८वा मजला, क्षेत्रफळ २६९ चौ.फु. कार्पेट क्षेत्र, ए विंग, इमारत क्र.२, जयहिंद एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, ओंकार इमारत, जानू भोये नगर, पश्चिम द्रुतगती महामार्ग, शांताराम तलावाजवळ, कुरार गाव, मालाड (पूर्व), मुंबई-४०००९७ येथील फ्लॅटचे मालक होते. सदर स्वर्गीय बंगाली छन्नू गुप्ता यांचे मुंबई येथे दिनांक ०९.०४.२०२१ रोजी निधन झाले आणि त्यांची पत्नी स्वर्गीय केवली देवी बंगाली गुप्ता यांचे त्यांच्या आधीच दिनांक ०२.०८.२०१४ रोजी निधन झाले होते. सदर फ्लॅटमधील त्यांचे सर्व हक्क, अधिकार, हितसंबंध आणि हिस्सा कायदेशीर वारस (१) श्रीमती लीलावती उमाशंकर गुप्ता, (२) श्री. अच्छेलाल बंगाली गुप्ता आणि (३) श्री. सच्चेलाल बंगाली गुप्ता यांनी दिनांक ०४.०९.२०२५ रोजी निष्पादित केलेल्या आणि नोंदणी क्र.एमबीआय-२१/१७९१४/२०२५ अन्वये नोंदणीकृत असलेल्या हक्कत्याग पत्राद्वारे श्री. सच्चेलाल बंगाली गुप्ता यांच्या नावे सोडून दिले आहेत; परिणामी, श्री. सच्चेलाल बंगाली गुप्ता हे सदर फ्लॅटचे पूर्ण मालक झाले आहेत.

सदर फ्लॅटच्या संदर्भात वारसा हक्क, विक्री, गहाण, भाडेपट्टा, धारणाधिकार, बक्षीस, ताबा किंवा इतर कोणत्याही मार्गाने ज्या कोणत्याही व्यक्तीचा कोणताही दावा, हक्क, अधिकार किंवा हितसंबंध असेल, अशा व्यक्तीने सदर बाब या सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून ०७ दिवसांच्या आत, आवश्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरूपात खाली स्वाक्षरीकर्त्या व्यक्तीस कळवणे आवश्यक आहे. जर विहित मुदतीत कोणताही आक्षेप प्राप्त झाला नाही, तर सदर हस्तांतरण श्री. सच्चेलाल बंगाली गुप्ता यांच्या नावे पूर्ण केले जाईल.

सही/-
विनय कुमार सिंग, वकील
बरकती कंपाऊंड, खोत कुवा रोड, पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळ, मालाड (पूर्व), मुंबई-४०००९७.
दिनांक: २४.०३.२०२६ **ठिकाण: मुंबई**

नोटीस

महालक्ष्मी एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या: पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई-४०००३० या संस्थेचे सभासद असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत सदनिका धारण करणाऱ्या खालील सभासदाचे निधन झाले आहे.

मयत सभासदाचे नाव व	मृत्यू दिनांक	वारसाचे नाव	रूम नं.
चिंगनुप्रसाद जिबोध कनौजिया	११.०१.२०२६	धर्मदीप चिंगनुप्रसाद कनौजिया	एच विंग/२०५

यांनी संस्थेकडे वारस नोंदणीबाबत अर्ज दाखल केला असून संस्था या जाहितातीद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ७ दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांच्या व हरकतींच्या पुष्ठर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाली नाही तर मयत सभासदाचे संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या / हरकत आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदणी व उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात संस्थेचे प्रशासक यांच्याकडे सकाळी ११.०० ते ०१.०० पर्यंत नोटीस दिलेल्या तारखेपासून नोटीसची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २४/०३/२०२६

सही /-
अध्यक्ष आणि सचिव
महालक्ष्मी एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, श्री. श्रीनिवास जी. दर्सी, फ्लॅट क्र.१०२, १ला मजला, बी विंग, सहजजीवन सहकारी गृहनिर्माण संस्था लि., इमारत क्र.२०, (२९-बी विंग) हनुमान मंदिराजवळ, सुभाष नगर, चेंबूर, मुंबई-४०००७१ येथील रहिवा आहेत, ते गेल्या तीस (३०) वर्षांपासून बेपत्ता असून आजपर्यंत घरी परत आलेले नाहीत.

सदर व्यक्ती हरवल्याची तक्रार मुंबईतील चेंबूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती, परंतु सर्वतोपरी प्रयत्न करूनही त्यांचा ठावठिकाणा अद्याप लागलेला नाही.

आता सदर श्री. श्रीनिवास जी. दर्सी यांचे कायदेशीर वारसदार अर्थात त्यांचे दोन मुले श्री. नितीन श्रीनिवास दर्सी आणि श्री. किरण श्रीनिवास दर्सी यांनी संबंधित सोसायटीच्या नोंदींमध्ये सदर फ्लॅटचे हस्तांतरण/फेरफार करण्यासाठी अर्ज केला आहे.

म्हणून, सदर फ्लॅटच्या संबंधात किंवा प्रस्तावित हस्तांतरणाविरुद्ध कोणताही दावा, हक्क, मालकी, हितसंबंध, आक्षेप किंवा मागणी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सहाय्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात स्वाक्षरीकर्त्यास कळवणे आवश्यक आहे.

विहित मुदतीत कोणताही आक्षेप न आल्यास, कोणालाही आक्षेप नाही असे गृहीत धरले जाईल आणि सदर फ्लॅटचे कायदेशीर वारसांच्या नावे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया पुढे चालू ठेवली जाईल.

दिनांक: २४.०३.२०२६ **वकील अंकिता जैन**
ठिकाण: मुंबई कार्यालय क्र.७, कुशल शॉपिंग कॉम्प्लेक्स, जी.एम. रोड, चेंबूर, मुंबई-४०००८९.
मोबाईल क्र.:+९१-९५९४३५०७३८
ईमेल: advankitbanthia@gmail.com

नमुना क्र.आयएनसी-२६

(कंपनी (स्थापना) अधिनियम, २०१४ चे नियम ३० नुसार)

कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतरीत करण्याकरिता वृत्तपत्रात प्रकाशित करावयाची जाहिरात

केंद्र शासन, क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र, एमसीए ५वा मजला, एव्हरेस्ट, १०० मरीन ड्राईव्ह, मुंबई-४००००२ **यांच्या समक्ष**

कंपनी कायदा २०१३ चे कलम १३(४) आणि कंपनी (स्थापना) अधिनियम २०१४ चे नियम ३० प्रकरणात

आणि

जर्मिनाइट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (सीआयएन: यु७२३००एमएच२००७पीटीसी१६८१८४) यांचे नोंदणीकृत कार्यालय: २१५, ॲट्रीयम, १०वा मजला, बी विंग, कोर्टयार्ड हॉटेलच्या पुढे, अंधेरी (पुर्व), मुंबई-४०००५९, महाराष्ट्र, भारत-४४००३४. ....**याचिकाकर्ता**

सर्वसामान्य जनतेस येथे सूचना देण्यात येत आहे की, **१६ मार्च, २०२६** रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर विशेष ठरावानुसार कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय **महाराष्ट्र राज्यातून गोवा राज्यात** स्थलांतरित करण्याकरिता कंपनीचे मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनचे बदलण्याच्या निश्चितीसाठी कंपनीद्वारे केंद्र शासन यांच्याकडे कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३ अंतर्गत अर्ज करण्याचे योजिले आहे.

कोणा व्यक्तिच्या हितास कंपनीचे नोंदणीकृत कार्यालयाच्या नियोजित बदलामुळे काही बाधा येत असल्यास त्यांनी त्यांच्या हिताचे स्वरूप व विरोधाचे कारण नमूद केलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांचे आक्षेप रजि. पोस्टाने किंवा गुंतवणूकदार तक्रार नमुना भरून **एमसीए पोर्टल** (www.mca.gov.in) वर सदर सूचना प्रकाशन तारखेपासून **१४ दिवसांच्या** आत **क्षेत्रिय संचालक, सहकार मंत्रालय (एमसीए), पश्चिम क्षेत्र, मुंबई, ५वा मजला, एव्हरेस्ट, १०० मरीन ड्राईव्ह, मुंबई-४००००२** येथील क्षेत्रिय संचालकांच्या कार्यालयात पाठवावी तसेच एक प्रत याचिकाकर्ता कंपनीला त्यांच्या खाली नमुद नोंदणीकृत कार्यालयात पाठवावे.

नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता: २१५, ॲट्रीयम, १०वा मजला, बी विंग, कोर्टयार्ड हॉटेलच्या पुढे, अंधेरी (पुर्व), मुंबई-४०००५९, महाराष्ट्र, भारत-४४००३४.

च्या वतीने व करिता
जर्मिनाइट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड
दिनांक: २४.०३.२०२६ **सही/-**
ठिकाण: मुंबई **डॉ. रणजीत नायर**
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन:००८८००१५

NOTICE

Shri SHRIKANT SITARAM BONDRE a Member of the TILAK NAGAR VARSHA Co-operative Housing Society Ltd. having address at BUILDING NO. 55 TILAK NAGAR, CHEMBUR MUMBAI 400089 and holding Flat No B-601 in the building of the society, died on 05.06.2005 without making any nomination. The society hereby invites claims and objections from the heir or heirs or other claimants/objector or objectors to the transfer of the said shares and interest of the deceased member in the capital/property of the society within a period of 15, days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society. If no claims/objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the deceased member in the capital/property of the society in such manner as is provided under the bye- laws of the society. The claims/objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the deceased member in the capital/property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants / objectors, in the office of the society/with the Secretary of the society between 10.00 A.M. to 06.00 P.M. from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

Place : Mumbai
Date : 24.03.2026

For and on behalf of
The **TILAK NAGAR VARSHA**
Co-op.Housing Society Ltd
Hon. Secretary.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, श्रीमती मालती अरुणकुमार मंडालिया, र/ठि.: परबत नगर, उदयराज इमारत क्र.१०, फ्लॅट क्र.१०१, एस.व्ही. रोड, कृष्ण मंदिर लेन, दहिसर पूर्व, मुंबई-४०००६८ यांनी ४थ्या मजल्यावर, 'ए' विंग, मातृ छाया इमारत, २७ दाफ्तरी रोड, टीपीएस-१, शिवाजी चौक, मालाड पूर्व, मुंबई-४०००९७, क्षेत्रफळ सुमारे २१६ चौ.फु. (२०.०५ चौ.मी.) वापरण्यायोग्य कार्पेट क्षेत्रफळाचे फ्लॅट क्र.४०२ संदर्भातील आपला हक्क, मालकी आणि हितसंबंध, त्यासोबत संलग्न असलेल्या सर्व हक्क आणि लाभांसह श्री. विकास रजनीकांत शाह, र/ठि.: डी-१०३, प्रताप नगर, दाफ्तरी रोड, पुष्पपार्क, मालाड पूर्व, मुंबई-४०००९७ यांना मोबदल्याच्या बदल्यात विक्री करण्यास, हस्तांतरित करण्यास आणि प्रदान करण्यास सहमती दर्शवली आहे.

याविषयी पुढे स्पष्ट करण्यात येते की, सदर फ्लॅटच्या मूळ वाटपधारक श्रीमती लिलावती पी. अदेसारा यांचे दिनांक ०२.०४.२०१५ रोजी मुंबई येथे निधन झाले, त्यांचे पती श्री. प्रभुदास अदेसारा यांचे यापूर्वीच दिनांक ०९.०९.१९९९ रोजी मुंबई येथे निधन झाले होते, त्यांच्या पश्चात त्यांची एकुलती एक विवाहित मुलगी श्रीमती मालती अरुणकुमार मंडालिया (हस्तांतरकर्त्या) या सदर फ्लॅटमधील मयताच्या अविभाजित हिश्श्याच्या एकमेव कायदेशीर वारसदार व प्रतिनिधी आहेत.

सदर फ्लॅट आणि/किंवा व्यवहारासंदर्भात कोणताही दावा, हक्क, मालकी, हितसंबंध किंवा आक्षेप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत अधोस्वाक्षरी करणाऱ्यास लेखी कळवावे.

विहित मुदतीत कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, व्यवहार पूर्ण मानला जाईल आणि सदर फ्लॅट कोणत्याही पुढील संदर्भाशिवाय खरेदीदाराच्या नावे हस्तांतरित केला जाईल.

ठिकाण: मुंबई
दिनांक: २४.०३.२०२६
या सूचनेद्वारे वितरीत केली:
सही/-
अजित उपाध्याय
वकील, उच्च न्यायालय
दुकान क्र.६१, तळमजला, व्ही मॉल, ठाकूर कॉम्प्लेक्स, साई बाबा मंदिराजवळ, पश्चिम द्रुतगती महामार्ग, कांदिवली पूर्व, मुंबई-४००१०१.
संपर्क क्र.: ०९३२१२४१७१८

नमुना अ
जाहिर अधिसूचना

(इनसॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (वॉलेन्टरी लिक्वीडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स, २०१७ चे नियम १४ अन्वये)

लॉकटन इन्शुरन्स ब्रोकर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता

१	कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव	**लॉकटन इन्शुरन्स ब्रोकर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड**
२	कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना तारीख	०३ एप्रिल, २०२४
३	ज्या प्राधिकरणाअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना	कंपनी निबंधक - मुंबई
४	कॉर्पोरेट व्यक्तीचे कॉर्पोरेट ओळख/ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक	यु६६२२०एमएच२०२४एफटीसी४२२७९८
५	कॉर्पोरेट व्यक्तीचे नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय पत्ता	८०२, ८वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, लोअर परळ, डिलाईल रोड, मुंबई, महाराष्ट्र, भारत-४०००१३.
६	कॉर्पोरेट व्यक्तीच्या संदर्भात दिवाळखोरी प्रारंभ तारीख	**२० मार्च, २०२६**
७	नाव, पत्ता, ई-मेल पत्ता, दुरध्वनी क्रमांक व परिसमपकाचे	**नाव:** कुमुदिनी दिनेश भालेराव **पत्ता:** एक्स्टासी, ८०३/८०४, ८वा मजला, सिटी ऑफ जॉय, जे.एस.डी. रोड, मुलुंड (प.), मुंबई-४०००८०. **ईमेल:** kumudiniparanjape@mmjc.in **दूर.क्र.:**+९१-९८१९०८७७१७ **नोंदणी क्र.:** आयबीबीआय/आयपीए-००२/आयपी-एन०००९९/२०१७-१८/१०२४२ **एएफए वैधता:** ३०.०६.२०२६
८	दावा सादर करण्याची अंतिम तारीख	**१९ एप्रिल, २०२६**

येथे सूचना देण्यात येत आहे की, **लॉकटन इन्शुरन्स ब्रोकर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड** यांच्या ऐच्छिक परिसमापनास **२० मार्च, २०२६** पासून प्रारंभ झाला आहे.

लॉकटन इन्शुरन्स ब्रोकर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना येथे कळविण्यात येत आहे की, बाब क्र.७ मध्ये नमूद पत्त्यावर परिसमापकाकडे **१९ एप्रिल, २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी त्यांच्या दाव्याचे पुरावे सादर करावे.

आर्थिक धनकोंनी त्यांचे दाव्याचे पुरावे फक्त विद्युत स्वरूपातच सादर करावेत.

अन्य इतर भागधारकांनी त्यांच्या दाव्याचे पुरावे व्यक्तिशः टपालाद्वारे किंवा विद्युत स्वरूपात सादर करावेत.

दाव्याचे चूकीचे किंवा फसवे पुरावे सादर केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल.

दिनांक: २३ मार्च, २०२६ **सही/-**
ठिकाण: मुंबई **कुमुदिनी दिनेश भालेराव**
लॉकटन इन्शुरन्स ब्रोकर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक
नोंदणी क्र.:आयबीबीआय/आयपीए-००२/आयपी-एन०००९९/२०१७-१८/१०२४२

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, **श्री. जनार्दन दत्ताराम परब** हे फ्लॅट क्र.००१, इमारत क्र.सी-२०, श्रीजी शांतीनगर को-ऑप.हौ.सो.लि., सेक्टर क्र.५, इमारत क्र.सी-१९/२०, शांतीनगर, मीरा रोड (पूर्व), जि. ठाणे-४०११०७ चे सद्भावनेने सदस्य आणि मालक असून त्यांच्याकडे भाग प्रमाणपत्र क्र.०२१ (२०.०९.१९९० रोजी वितरीत केलेले प्रत्येकी रु.५०/- चे ५ शेअर्स, अनुक्रमांक १०१ ते १०५) आहे. सदर सदस्याचे ३१.१२.२०२२ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात त्यांचे कायदेशीर वारसदार: **(१) श्रीमती प्रमिला जनार्दन परब (पत्नी), (२) श्रीमती प्रज्ञा महेश कदम (ऊर्फ दीपाली जनार्दन परब) (मुलगी), (३) श्री. महेश जनार्दन परब (मुलगा)** आणि **(४) श्रीमान जनार्दन परब (मुलगा)** हे आहेत.

असे नमूद केले आहे की, **श्री. महेश जनार्दन परब** आणि **श्रीमती प्रमिला जनार्दन परब** हे इतर कायदेशीर वारसदारांच्या संमतीने सदर फ्लॅट आणि शेअर्समध्ये अनन्य हक्क, मालकी आणि हितसंबंधांवर दावा करत आहेत, ज्यांनी ठाणे येथील सह उप-निबंधक यांच्यासमोर एक मुक्तता करारनामा सादर केले आहे.

वारसा हक्काने किंवा इतर कोणत्याही प्रकारे सदर फ्लॅट आणि शेअर्समध्ये कोणताही दावा, हक्क, मालकी किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, याद्वारे सूचित केल्याप्रमाणे, आपले दावे/आक्षेप सहाय्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात प्रकाशनापासून **१५ दिवसांच्या** आत स्वाक्षरीकर्त्याकडे सादर करावेत, अन्यथा असे दावे रद्द मानले जातील आणि हस्तांतरण **श्री. महेश जनार्दन परब** आणि **श्रीमती प्रमिला जनार्दन परब** यांच्या नावे केले जाईल, जे त्यानंतर कायद्यानुसार त्याचा व्यवहार करण्यास पात्र असतील.

ठिकाण: मिरा रोड ठाणे, दिनांक: २४.०३.२०२६
सही/-
श्री. एस.जी. पाटील, वकील उच्च न्यायालय
''अपुर्वा'' दुकान क्र.६, इमारत क्र.बी-११, सेक्टर क्र.७, शांतीनगर, मिरा रोड (पुर्व), ठाणे-४०११०७.

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, माझे अशील अर्थात **१) श्री. सुरेश अरुमुगम मुदलियार, २) श्रीमती अंजली सुरेश मुदलियार** आणि **३) श्री. पलानी अरुमुगम** हे खालील अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार उल्लेख असलेला निवासी फ्लॅट, तिच्या मालक **श्रीमती मलिता परेरा** यांच्याकडून खरेदी करण्यासाठी वाटाघाटी करत आहेत.

खालील अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या, वर नमूद केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात, विक्री, अदलाबदल, गहाण, दान, विश्वस्त निधी, बोजा, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, धारणाधिकार किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचा कोणताही हक्क, मालकी, दावा, हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी आपली माहिती लेखी स्वरूपात **बी-१२, अरुणोदय कोहौसोलि., सोसायटी क्र.११, केअर हॉस्पिटलजवळ, म्हाडा, मालवणी, मालाड पश्चिम, मुंबई-४०००९५** या पत्त्यावर आजच्या तारखेपासून **१४ दिवसांच्या** आत कळवावी. असे करण्यात अयशस्वी झाल्यास, अशा व्यक्तीचा दावा सोडून दिला आहे आणि/किंवा त्याग केला आहे किंवा सोडून दिला आहे असे मानले जाईल आणि त्यानंतर तो विचारात घेतला जाणार नाही.

अनुसूची यापुढे या नावाने संदर्भित: (सदर फ्लॅटचे वर्णन)

फ्लॅट क्र.२०४, २रा मजला, बी विंग, न्यू प्रिन्स रीजन्सी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. म्हणून ज्ञात सोसायटी, बिल्टअप क्षेत्र ४०.८९ चौ.मी., अंकुर चिल्ड्रन्स होमजवळ, काणाकिया रोड, मीरा रोड पुर्व-४०११०७, तळजमला जमीन सर्व्हे क्र.१५४/१०, गाव नवघर, नोंदणी जिल्हा आणि उप-जिल्हा ठाणे, मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या न्यायक्षेत्रात असलेल्या जमिनीचे सर्व भाग व खंड. हा अर्ज सोडून दिलेला किंवा त्यागलेला असून, त्यानंतर त्यावर विचार केला जाणार नाही.

मुंबई, दिनांक .... मार्च, २०२६
रिझवान एन. कुरेशी
वकील, उच्च न्यायालय

जाहीर सूचना

सर्व संबंधित व्यक्ती, सद्भावनाधारक रहिवासी, पर्यावरण गट, स्वयंसेवी संस्था आणि इतर यांना याद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाने, मे. छेडा डेव्हलपमेंट्स, कार्यालय पत्ता: १०९-१११, गोयल शॉपिंग सेंटर, एस.व्ही. रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९२ यांना त्यांच्या 'छेडा ग्रीन्स' या प्रस्तावित निवासी/व्यावसायिक प्रकल्पासाठी पर्यावरण मंजुरी दिली आहे. हा प्रकल्प जुना एस.क्र./एच.क्र.३०३/१ए, १बी, २, ३, ४, ५, ८; ३०३/९, १४; २९५/१, नवीन एस.क्र./एच.क्र.१७९/१ए, १एबी, २, ३, ४, ५, ८; १८१/९, १४; १७८/१, गाव नवघर, तालुका व जिल्हा मुंबई-४०००९२ येथील भूखंडांवर आहे. मे. छेडा डेव्हलपमेंट्स यांच्याद्वारे ठाणे येथे पर्यावरण समितीच्या पत्र क्र.एसआयए/एमएच/इन्फ्रा२/५६५३३४/२०२६ दिनांक १४.०३.२०२६ अन्वये मंजुरी पत्राची प्रत परिवेश पोर्टलवर उपलब्ध आहे आणि पर्यावरण व वन मंत्रालयाच्या https://parivesh.nic.in/ या संकेतस्थळावर देखील पाहता येईल.

दिनांक: २४.०३.२०२६
ठिकाण: मुंबई
मे. छेडा डेव्हलपमेंट्स
१०९-१११, गोयल शॉपिंग सेंटर, बोरिवली (प.), मुंबई-४०००९२, महाराष्ट्र.

बजाज फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: बजाज ऑटो लिमिटेड कॉम्प्लेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे-४११०३५.
प्राधिकृत अधिकाऱ्याची माहिती: नाव: **श्री. सौमल्या बी.**, ईमेल आयडी: soumalya.b@bajajfinserv.in, मोबा.क्र.८५८२८२३५३६

परिशिष्ट-४-ए (नियम ८(६) ची तरतुदी पहा)
सरफासी कायदा २००२ अंतर्गत ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (कायदा) अंतर्गत स्थावर मालमत्तेची विक्री

बजाज फायनान्स लिमिटेड **(बीएफएल)** कडे तारण ठेवलेल्या आणि ज्याचा ताबा घेण्यात आला होता त्या खालील प्रतिभूत मालमत्तेच्या संदर्भात सर्वसाधारणपणे जनतेला आणि कर्जदार/सह-कर्जदार/तारणकर्ता यांना सूचना देण्यात येत आहे, कायद्याच्या तरतुदींनुसार बीएफएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले हे कर्ज येथे नमूद केलेल्या रकमेची आणि पुढील लागू व्याज, शुल्क आणि खर्च इत्यादींच्या वसुलीसाठी लिलावाद्वारे विकले जाईल.

खाली वर्णन केलेली प्रतिभूत मालमत्ता **जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे आणि जसे आहे जे काही आहे या तत्वानुसार** सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स (नियम) च्या नियम क्र.८ व ९ अंतर्गत थकबाकी वसूल करण्यासाठी विक्री केली जात आहे. **खालीलप्रमाणे तपशीलवार:**

कर्जदार व सह-कर्जदाराचे नाव आणि पत्ता	**सोमसुभ्रो चौधरी (कर्जदार), पत्ता:** फ्लॅट क्र.१४०१, बी विंग, पॅसिफीक टॉवर्स, व्हीपी रोड, एसव्ही रोड, सागर सिटी, अंधेरी पश्चिम, रेल्वे स्टेशन, मुंबई-४०००५८. **दुसरा पत्ता:** १५०६, बी विंग, पंचवटी कोहौसो., पवई अंधेरी, मुंबई-४०००७२. **तानिया दास चौधरी (सह-कर्जदार), पत्ता:** फ्लॅट क्र.१४०१, बी विंग, पॅसिफीक टॉवर्स, व्हीपी रोड, एसव्ही रोड, सागर सिटी, अंधेरी पश्चिम, रेल्वे स्टेशन, मुंबई-४०००५८.
कर्ज खाते क्रमांक	४०५एसएचओ२२३५४१७०, ४०५एसएचओ२२३९३३२३ आणि ४०५एसएचओ२२३९४०४९
कलम १३(२) अंतर्गत वैधानिक मागणी सूचना तारीख व रक्कम	सूचना दिनांक १२ जुलै, २१ मागणी रक्कम रु.३७,१४,८०५/-
०३.०१.२०२६ पर्यंतची थकबाकी रक्कम	१९.०३.२६ रोजी रु.६६,७८,९४२.६३/- (रुपये सहासष्ट लाख अठ्ठ्याहत्तर हजार नऊशे बेचाळीस आणि पैसे त्रेसष्ट फक्त)
स्थावर मालमत्तेचे वर्णन	वर्णन केलेल्या बिगर-कृषी मालमत्तेच्या जागेचे सर्व भाग व खंड: फ्लॅट क्र.४पी, ब्लॉक-के, ४था मजला, प्रिमायसेस क्र.१६९, एन एस सी बोस रोड, नरेंद्रपुर पी.एस सोनारपूर, कोलकाता, पश्चिम बंगाल-७००१०३
राखीव किंमत रू.मध्ये	रु.३७,००,०००/-
इरठे	रु.३,७०,०००/-
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	११.०४.२६ रोजी दु.३.०० ते ५.००वा. पर्यंत
ई-लिलाव पोर्टल	https://bankauctions.in
इरठे सादर करण्याची शेवटची तारीख	१०.०४.२६
बोली वाढीव रक्कम रू.मध्ये	रू.२५,०००/-
सुरक्षित कर्जदाराला ज्ञात असलेले ओझे	ज्ञात नाही
मालमत्ता तपासणी तारीख	२१.०३.२६ ते १०.०४.२६ रोजी कामकाजाच्या दिवशी स.९.३० ते सायं.५.३० या दरम्यान पूर्व भेटीसह

सर्वसाधारण जनतेने आणि विशेषतः कर्जदारांनी कृपया लक्षात ठेवा की जर येथे नियोजित तारखेला लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाला तर प्रतिभूत धनको, प्रतिभूत धनकोच्या विवेकबुद्धीनुसार, खाजगी कराराद्वारे विक्रीद्वारे सिक्युरिटी इंटरेस्ट लागू करू शकतो. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, कृपया https://bankauctions.in आणि https://www.bajajfinserv.in/sarfaesi-auction-notices ही लिंक पहा.

दिनांक: २४.०३.२०२६, **ठिकाण:** मुंबई/कोलकाता **सही/- प्राधिकृत अधिकारी, बजाज फायनान्स लिमिटेड**

वकील - सुशांत मिश्रा

वसई येथील मा.श्री. यु. एस. जाधव, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर यांचे न्यायालयात जाहीर नोटीस

CNR No. MHTH250125482025
दि.चौ. अर्ज : १११ / २०२६
निशानी क. : ५
पुढील तारीख : २४/०४/२०२६

Mr. Vinod Shantilal Mayani
R/at. 3-, Laxmi Niwas, Carter Road No. 3,
Opp. Amabji Temple, Borivali East S.O.,
Mumba - 400066. **.... अर्जदार**

विरुध्द

None **....गैरअर्जदार**

ज्यापेक्षा **Late. Himat Shantilal Mayani** हे **दिनांक १० माहे फेब्रुवारी २०२४** रोजी **सी/१८, त्रिवेणी संगम को.ऑ.हौ.सो. एम.बी. इस्टेट विरार पश्चिम, ठाणे, महाराष्ट्र - ४०१३०५** येथे स्वर्गवासी झाले. मयताचे अर्जदार हा भाऊ आहे. अर्जदार हे त्यांचे वारस असल्यामुळे त्यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा उक्त अर्जदार हया मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून एक महिण्याचे आत किंवा **दि. २४/०४/२०२६ सकाळी ११.०० वाजता** त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या. या जाहीर नोटीस वरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू **Late. Himat Shantilal Malani** यांचे कायदेशीर वारसाचे सर्टिफिकेट देईल.

आज दिनांक **२१ माहे फेब्रुवारी २०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

हुकुमावरुन,
सही/-
सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, वसई

धूत इंडस्ट्रियल फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय पत्ता: ५०४, रहेजा सेंटर, २१४, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१.
कॉर्पोरेट कार्यालय पत्ता: १२०९, रहेजा सेन्टर, २१४, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१.
सीआयएन:एल५१९००एमएच१९७८पीएलसी०२०७२५, **ईमेल:** cosecdifl@gmail.com, **दूर.:**(०२२) २२८४५०५०, २२८३५१५२, **फॅक्स:** २२८७११५५, **वेबसाईट:** www.dhootfinance.com

भागधारकांसाठी सूचना
भौतिक स्वरूपातील भागांच्या हस्तांतरणाच्या विनंत्या पुन्हा सादर करण्यासाठी विशेष खिडकी

सेबीचे परिपत्रक क्र.एचओ/३८/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६, दिनांक ३० जानेवारी २०२६ अन्वये आणि सेबीच्या मागील परिपत्रक क्र.सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७, दिनांक ०२ जुलै २०२५ च्या अनुषंगाने, **धूत इंडस्ट्रियल फायनान्स लिमिटेड**च्या भागधारकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, १ एप्रिल २०१९ पूर्वी विक्री/खरेदी करण्यात आलेल्या भौतिक स्वरूपातील रोख्यांच्या हस्तांतरण पत्रांचे पुनःसादरीकरण आणि त्यांचे डीमॅट करण्यासाठी, ५ फेब्रुवारी २०२६ ते ४ फेब्रुवारी २०२७ या एक वर्षाच्या कालावधीसाठी एक विशेष खिडकी खुली करण्यात आली आहे.

भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, ज्या हस्तांतरण विनंत्या यापूर्वी सादर करण्यात आल्या होत्या, परंतु कागदपत्रे, प्रक्रिया किंवा इतर कारणांमधील त्रुटींमुळे नाकारल्या गेल्या होत्या, परत पाठवल्या गेल्या होत्या किंवा ज्यांच्यावर कार्यवाही झाली नव्हती, अशा विनंत्यांसाठीही ही विशेष संधी उपलब्ध आहे. भागधारकांनी पुढे याचीही नोंद घ्यावी की, या विशेष संधी अंतर्गत हस्तांतरित होणारे रोखे, हस्तांतरण स्वीकारणाऱ्याच्या खात्यात केवळ डीमॅट स्वरूपातच जमा केले जातील आणि हस्तांतरणाच्या नोंदणीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीसाठी ते लॉक-इन स्थितीत राहतील. या लॉक-इन कालावधी दरम्यान, अशा रोख्यांचे हस्तांतरण करणे, त्यावर धारणाधिकार नोंदवणे किंवा ते तारण ठेवणे या गोष्टींना परवानगी नसेल.

गुंतवणूकदार/हस्तांतरण स्वीकारणाऱ्या व्यक्तीने पूर्ण करावयाच्या कार्यपद्धती आणि अटींचा तपशील सदर सेबी परिपत्रकात सविस्तरपणे देण्यात आला आहे. हे सेबी परिपत्रक खालील दुव्यावर उपलब्ध आहे: https://www.sebi.gov.in/legal/circulars/jan-2026/ease-of-doing-investment-special-window-for-transfer-and-dematerialisation-of-physical-securities_99411.html

कृपया याची नोंद घ्यावी की, ज्या विनंत्यांसोबत मूळ भाग प्रमाणपत्रे, हस्तांतरण पत्र आणि इतर पूरक कागदपत्रे जोडलेली असतील, केवळ अशाच विनंत्यांचा विचार या विशेष संधी अंतर्गत केला जाईल.

ज्या भागधारकांना या संधीचा लाभ घ्यायचा आहे, त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी आमच्या रजिस्ट्रार आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधीशी संपर्क साधावा. तपशील खालीलप्रमाणे आहेत:

एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड),
नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता: सी१०१, एम्बसी २४७, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००८३, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी:+९१ ८१०८११६७६७
ई-मेल आयडी: investor.helpdesk@in.mpms.mufg.com
पात्र भागधारकांना या विशेष खिडकीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
धूत इंडस्ट्रियल फायनान्स लिमिटेडकरिता
सही/-
दिनांक: २३ मार्च, २०२६ **स्नेहा शाह**
ठिकाण: मुंबई **कंपनी सचिव व समक्ष अधिकारी**

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि सर्व संबंधितांना सूचना देण्यात येत आहे की, माझे अशील श्री. अनंत सहदेव शेडगे हे फ्लॅट क्र.बी-३०, बी विंग, २रा मजला, क्षेत्रफळ सुमारे २८२ चौ.फु. कार्पेट क्षेत्र, संभाजी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, डिलाईल रोड, एन. एम. जोशी मार्ग, मुंबई-४०००१३ (यापुढे सदर फ्लॅट म्हणून संदर्भ) येथील फ्लॅट जागा आपली मुलगी कुमारी श्रुती अनंत शेडगे हिच्या नावे बक्षीस म्हणून देऊ इच्छितात.

संभाजी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेडने दिनांक १८.०५.१९९७ रोजी वितरीत केलेल्या वाटप पत्रानुसार श्री. तुकाराम ढाकू मेडेकर यांना त्यांच्या जुन्या भाड्याच्या जागेच्या बदल्यात सदर फ्लॅट मालकी हक्काने विनामूल्य वाटप करण्यात आला होता. त्यांच्या हयातीत त्यांनी सदर फ्लॅट आणि संस्थेच्या शेअर्सच्या संदर्भात, त्यांची पत्नी श्रीमती अनुराधा तुकाराम मेडेकर आणि त्यांचे भाचे श्री. अनंत सहदेव शेडगे यांना प्रत्येकी ५०% हिश्श्यासाठी नामनिर्देशन अर्ज सादर केला होता, आणि त्यांना त्यांच्या वैवाहिक जीवनातून कोणतेही अपत्य नव्हते. सदर तुकाराम ढाकू मेडेकर यांचे दिनांक ०६.०६.२०११ रोजी निधन झाले, तद्नंतर संस्थेने शेअर्स आणि सदस्यत्व संयुक्तपणे श्रीमती अनुराधा तुकाराम मेडेकर आणि श्री. अनंत सहदेव शेडगे यांच्या नावे हस्तांतरित केले. तद्नंतर दिनांक १३.०७.२०२१ रोजी श्रीमती अनुराधा तुकाराम मेडेकर यांचे निधन झाले आणि त्यानंतर सोसायटीने सदर फ्लॅटच्या संदर्भात शेअर्स आणि सदस्यत्व केवळ श्री. अनंत सहदेव शेडगे यांच्या नावे हस्तांतरित केले, जे सध्या सदर सोसायटीचे सदस्य आहेत.

उपरोक्त फ्लॅटच्या संदर्भात मालकी, विक्री, बक्षीस, वारसा, गहाण, धारणाधिकार, बोजा किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध किंवा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत, अशा दाव्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यासह, खाली नमूद केलेल्या पत्त्यावर स्वाक्षरीकर्त्यास लेखी कळवावे.

जर विहित मुदतीत कोणताही दावा प्राप्त झाला नाही, तर असे गृहीत धरले जाईल की सदर फ्लॅटच्या संदर्भात कोणाचाही कोणताही दावा नाही, आणि प्रस्तावित बक्षीस व्यवहार पूर्ण झाला आहे, आणि त्यानंतर केलेला कोणताही असा दावा, जर केला गेला असेल, तर तो सोडून दिलेला किंवा त्यागलेला मानला जाईल.

मालमत्तेचे वर्णन

निवासी फ्लॅट क्र.बी-३०, बी विंग, २रा मजला, क्षेत्रफळ सुमारे २८२ चौ.फु. कार्पेट क्षेत्र, संभाजी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड म्हणून ज्ञात इमारत, २७९, एन. एम. जोशी मार्ग, डिलाईल रोड, मुंबई-४०००१३, प्लॉट क्र.९२, लोअर परळ विभाग, मुंबई येथे असलेल्या जमिनीचे सर्व भाग व खंडावर बांधलेले.

दिनांक: २४.०३.२०२६ **सही/-**
ठिकाण: मुंबई **ॲड. संतोष आर. पाटील**
वकील उच्च न्यायालय
डी-४, तळमजला, श्री पिंपळेश्वर कोहौसोलि., एम.पी. मार्ग, करी रोड (पश्चिम), मुंबई-४०००१३.

मुख्य कार्यालय - एम. एस. मीडिया अॅण्ड पब्लिकेशन प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक, **व्ही.पी. चांदवडकर** यांनी सोमानी प्रिंटींग प्रेस, गाला नं. ३ आणि ४, अमिन इंडस्ट्रीअल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड, नं. २, जवाहर नगर फाटक ब्रीज, गोरेगाव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३ येथे छापून एम. एस. मीडिया अॅण्ड पब्लिकेशन प्रा. लि. केसर प्लाझा, ५०२ ए/विंग, प्लॉट नं.२३९. आर. डी. पी-६ म्हाडा लेआऊट, चारकोप, कांदिवली (प.), मुंबई ४०००६७ येथून प्रसिद्ध केले. दूरध्वनी : ०२२-२०८९१२७६, ०२२-२८६९७६४५/४७, ०९८३३८९१८८८, ९८३३८५२१११ फॅक्स :२८६८२७४४ अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख याधील व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही.
संपादक- डी. एन. शिंदे, कायदेविषयक सल्लागार- ॲड. भानुदास जगताप आणि एमकेएस लिगल असोसिएट्स, RNI No. MAHAMAR/2001/05426. ई-मेल : mumbai.lakshadeep@gmail.com, lakshadeepp@rediffmail.com./msmedia@rediffmail.com, mumbailakshadeepnews@gmail.com.